ZPJAL-2029/22/2025-ZPJG/GAD

# जिल्हा परिषद जळगाव
## (सामान्य प्रशासन विभाग)

फोन नं.०२५७-२२२४२५५ Email:dyceogenjalgaon@gmail.com

जा.क्र.साप्रवि/रवका/आरआर/ /२०२५/1249
सामान्य प्रशासन विभाग, जि.प.जळगाव
दिनांक:- 25/०४/२०२५

प्रति,
खाते प्रमुख, (सर्व )
जिल्हा परिषद, जळगांव

**विषय-** दिव्यांग युडीआयडी. प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचा-यांबाबतीत प्रशासकिय कारवाई करण्याबाबत.

**संदर्भ**–०१. आयकर अधिनियम १९६१ चे कलम ६५
०२. मा. अवर सचिव, शिक्षण व सेवा योजना विभाग,महाराष्ट्र शासन, यांचेकडील पत्र दि.०३.०३.१९९०
०३. शासन निर्णय व वित्त विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. वाहम-१३००/प्र.क्र.५७ /सेवा-५दि. ०४.०६.२००१
०४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन,यांचे क्र. अपंग-२००४/प्र.क्र.१८/०४/१६ अ दि.१५.१२.२००४
०५. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.एसआरव्ही.-२०११/प्र.क्र. २८४/१२ दि.२१.१०.२०११
०६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे क्र.समय-२०१३/प्र.क्र.२०/१८(रवका) दि.१६.०७.२०१३
०७. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन,जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दि.१५.०५.२०१४
०८. शासन निर्णय, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांचे शासन परिपत्रक दि. वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५ दि. ०३.०६.२०१४
०९. दिव्यांग व्यकती अधिनियम,२०१६ प्रकरण १० मधील कलम ५६,५७ व ५८
१०. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई क्र.अप्रवि- २०१८/प्र.क्र.४६/आरोग्य६, दि.१४.०९.२०१८
११. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई क्र.अप्रवि- २०२०/प्र.क्र.२७२ /आरोग्य६,दि.१४.०९.२०१८
१२. शासन अधिसुचना,सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे दि.२१.०६.२०२१
१३. शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई क्र दिव्यांग-२०२१ /प्र.क्र.४५/दि.क.२, दि. ०२.१२.२०२१
१४. शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई क्र दिव्यांग-२०२१ /प्र.क्र.४५/दि.क.२, दि. ३१.०३.२०२२
१५. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन, यांचे क्र.दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ दि.क २ दि.२०.०४.२०२३
१६. शासन परिपत्रक,दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन क्र.दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२ दि.२७.०६.२०२४

उपरोक्त विषयान्वये आपणास सुचित करण्यात येते कि,संदर्भ क्र.१३ वरिल दि.०२.१२.२०२१ चे शासन निर्णयान्वये दि.०२ ऑक्टो. २०१८ व दि. १४.०९.२०१८ पासून युडीआयडी. कार्ड विशेष मोहिम राबवून वितरीत करणेच्या सूचना आहेत. त्यानुसार कर्मचा-यांनी सन २०१८ पूर्वीचे ऑफलाईन दिव्यांग प्रमाणपत्र सादर केलेली आहेत.त्यांनी तातडीने ऑनलाईन युडीआयडी प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे.

उक्त संदर्भ क्र. १६ चे परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनेनुसार दिव्यांगासाठी विविध योजना / नोकरी मधील आरक्षण /पदोन्नती सवलती इ. चा लाभ मिळण्यासाठी दिव्यांगासाठी वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी कार्ड) अनिवार्य करण्यासंदर्भात सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अशा दिव्यांग व्यक्तींना सदर शासन परिपत्रकाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या मुदतीत सार्वजिनिक आरोग्य विभागाच्या दि.१४ सप्टे. २०१८ च्या शासन निर्णयानुसार / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणा-या वैद्यकिय मंडळाकडून दिव्यांगत्व प्रमाणपत्र / वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी कार्ड) प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील जे दिव्यांग व्यक्ती उक्त मुदतीनंतरसुध्दा सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणार नाहीत ते दिव्यांगासाठी सवलती / योजना इ. लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही.

या अनुषंगाने आपल्या विभागाकडील विविध संवर्गातील ज्या दिव्यांग कर्मचारी यांना अद्याप ऑनलाईन युडीआयडी कार्ड सादर केलेले नाहीत.त्यांचे कडून ओळपत्रासाठी नाव नोंदणी क्रमांक प्राप्त करुन घेतल्यानंतरच दिव्यांगाचे लाभ देण्यात यावे तसेच शासन परिपत्रकाच्या दिनांकापासून एक वर्षानंतर जे अधिकारी / कर्मचारी युडीआयडी. कार्ड सादर करणार नाहीत. त्यांचेवर खालील प्रमाणे कारवाई करावी.

१. दिव्यांग जेष्ठता यादीतून नाव काढून टाकण्यात यावे.
२. दिव्यांग भत्ता रद्द करण्यात यावा.
३. दिव्यांग प्रवास भत्ता परिगणना करुन १०० टक्के वसुल करुन शासन सदरी भरणा करण्यात यावा.
४. व्यवसाय कर माफ करण्यात आल्याने त्यांची परिगणना करुन येणारी वसुली पात्र रक्कम शासन सदरी भरणा करण्यात यावा.
५. आयकर कपातीतून दिव्यांग कोट्यातून सुट घेतली असल्यास तो वसुल करुन शासन सदरी भरणा करावा.
६. ज्या कर्मचा-यांनी दिव्यांग कोट्यातून नियुक्ती झाली असल्यास त्यांना पुढील पदोन्नतीस पात्र करु नये.
७. कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी दिव्यांग कर्मचा-यांना दिलेली अर्धा तास सुविधा रद्द करणे व जेव्हा पासून अर्धा तास सुविधा लागू केली असले तेव्हा पासूनच्या तासांची परिगणना करुन त्या दिवसाची अर्जित रजा भरुन घेणे

उक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

ज्या कर्मचां-यांनी अद्याप पर्यन्त युडीआयडी कार्ड सादर न करता लाभ घेतल्याचे निदर्शनास आलेस त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा,(वर्तणुक) नियम ३ चा भंग केला म्हणुन त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ नुसार विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.याची कार्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

Signed by
Minal Karanwal
Date: 25-04-2025 12:00:53

**मिनल करनवाल (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,जळगांव**

**प्रत –**

१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर
२. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे, यांना माहीतीस्तव सविनय सादर

प्रत- सा.प्र.वि कार्यासन - आस्था २, आस्था-५,आस्था८/९,आस्था१०/११, वाहने,आस्था-७ यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

REDMI NOTE 12 PRO 5G 25/04/2025 17:01